भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७

(१८६७ चा अधिनियम क्रमांक २५)

[१ ऑक्टोबर, १९७८ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Press and Registration of Books Act, 1867

## (Act No. 25 of 1867)

**[ As in force on the 1st October, 1978 ]**

( महाराष्ट्र विशोधन अधिनियमांसहित )

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

१९७९

[ किंमत—८० पैसे ]

# मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७

## कलमांचा क्रम

प्रास्ताविका

### भाग १ ला

कलमे

प्रारंभिक

१. निर्वचन खंड.

२. [निरसित.]

### भाग २ रा

मुद्रणालये आणि वृत्तपत्रे यांविषयी

३. पुस्तके व कालिके यांवर मुद्रित करावयाचा तपशील.

४. मुद्रणालयाच्या व्यवस्थापकाने अधिकथन करणे.

५. वृत्तपत्रे प्रकाशित करण्याबाबतचे नियम.

५क. जम्मू व काश्मीरमधील मुद्रणालयांचे व्यवस्थापक आणि तेथील वृत्तपत्रांचे मुद्रक व प्रकाशक यांनी विनिर्दिष्ट कालावधीमध्ये नवीन अधिकथने स्वाक्षरीनिशी करून देणे.

६. अधिकथनाचे अधिप्रमाणन.

निक्षेप.

प्रतींचे निरीक्षण व पुरवठा.

७. अधिकथनाची कार्यालयीन प्रत हा प्रथमदर्शनी पुरावा असणे.

८. अधिकथनावर सही केल्यानंतर ज्या व्यक्ती मुद्रक किंवा प्रकाशक म्हणून राहिलेल्या नसतील त्या व्यक्तींनी नवीन अधिकथन करून देणे.

अधिप्रमाणन आणि दप्तरदाखल करणे.

प्रतींचे निरीक्षण व पुरवठा.

प्रत पुराव्यात दाखल करणे.

८क. ज्या व्यक्तीचे नाव चुकीने संपादक म्हणून प्रकाशित करण्यात आले असेल त्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्यासमोर अधिकथन करून देता येईल.

८ख. अधिकथन रद्द करणे.

८ग. अपील.

### भाग ३ रा

पुस्तके सादर करणे

९. अधिनियमाच्या प्रारंभानंतर मुद्रित केलेल्या पुस्तकांच्या प्रती शासनाला विनाशुल्क सादर करणे.

१०. कलम ९ खाली सादर केलेल्या प्रतींची पावती.

११. कलम ९ खाली सादर केलेल्या प्रतींची विल्हेवाट.

११क. भारतामध्ये मुद्रित केलेल्या वृत्तपत्रांच्या प्रती शासनाला विनाशुल्क सादर करणे.

११ख. वृत्तपत्रांच्या प्रती मुद्रण निबंधकाला सादर करणे.

### भाग ४ था

दंड

१२. कलम ३ मधील नियमाविरुद्ध असलेल्या मुद्रणाबद्दल दंड.

१३. कलम ४ अनुसार आवश्यक असलेले अधिकथन न करता मुद्रणालय कब्जात ठेवण्या-बद्दल दंड.

१४. खोटे अधिकथन करण्याबद्दल शिक्षा.

१५. नियमांना न अनुसरता वृत्तपत्रे मुद्रित करणे किंवा प्रकाशित करणे याबद्दल दंड.

१५क. कलम ८ खाली अधिकथन करून देण्यात कसूर केल्याबद्दल दंड.

१६. पुस्तके सादर न करण्याबद्दल किंवा मुद्रकाला नकाशे न पुरवण्याबद्दल दंड.

१६क. वृत्तपत्रांच्या प्रती शासनाला विनाशुल्क पुरवण्यात कसूर करण्याबद्दल दंड.

१६ख. वृत्तपत्रांच्या प्रती मुद्रण निबंधकाला पुरवण्यात कसूर करण्याबद्दल दंड.

१७. गमावणीपात्र रकमांची वसुली आणि त्या रकमांची व द्रव्यदंडांची विल्हेवाट.

## भाग ५ वा

### पुस्तकांची नोंदणी

१८. पुस्तकांच्या टाचणांची नोंदणी.
१९. नोंदणी केलेल्या टाचणांचे प्रकाशन.

## भाग ५ वा—क

### वृत्तपत्रांची नोंदणी

१९क. मुद्रण निबंधक व अन्य अधिकारी यांची नियुक्ती.
१९ख. वृत्तपत्रांची नोंदवही.
१९ग. नोंदणी प्रमाणपत्रे.
१९घ. वृत्तपत्रांनी वार्षिक विवरण, इत्यादी सादर करणे.
१९ङ. वृत्तपत्रांनी सादर करावयाची प्रतिवेदने व अहवाल.
१९च. अभिलेख व दस्तऐवज पाहण्याचा अधिकार.
१९छ. वार्षिक अहवाल.
१९ज. नोंदवहीतील उतान्यांच्या नकला पुरवणे.
१९झ. शक्तींचे प्रत्यायोजन.
१९ञ. मुद्रण निबंधक व अन्य अधिकारी हे लोकसेवक असणे.
१९ट. कलम १९घ किंवा कलम १९ङ, इत्यादींच्या व्यतिक्रमणाबद्दल दंड.
१९ठ. माहितीची अनुचित रीत्या वाच्यता करण्याबद्दल दंड.

## भाग ६ वा

### संकीर्ण

२०. नियम करण्याची शक्ती.
प्रकाशन.
२०क. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.
२०ख. या अधिनियमाखाली केलेल्या नियमांत, त्यांचे व्यतिक्रमण झाल्यास दंड करण्याचा उपबंध करता येईल.
२१. अधिनियमाच्या प्रवर्तनापासून पुस्तकांचा एखादा वर्ग वगळण्याची शक्ती.
२२. विस्तार.
२३. [निरसित.]
महाराष्ट्र विशोधन अधिनियम

# मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७[1]

## ( १८६७ चा अधिनियम क्रमांक २५ )

[२२ मार्च, १८६७]

मुद्रणालये व वृत्तपत्रे यांचे विनियमन करण्यासाठी, [2][भारतात] मुद्रित केलेली पुस्तके [3][व वृत्तपत्रे] यांच्या प्रतींचे जतन करण्यासाठी व अशा पुस्तकांची [3][व वृत्तपत्रांची] नोंदणी करण्यासाठी अधिनियम.

---

१. 'भारतीय संक्षिप्त नाव अधिनियम, १८९७' (१८९७ चा १४) याद्वारे दिलेले संक्षिप्त नाव. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८६७, पृ. १९१; आणि कौन्सिलाच्या कामकाजवृत्ताकरिता पहा, कित्ता, पुरवणी, पृष्ठे ७२, १५६ आणि २९९.

'विधि स्थानिक विस्तार अधिनियम, १८७४' (१८७४ चा १)-कलम ३ द्वारे हा अधिनियम, अनुसूचित जिल्हे वगळून भारताच्या सर्व प्रांतांमध्ये अंमलात आल्याचे जाहीर करण्यात आले होते.

हा अधिनियम अनुसूचित जिल्हे वगळून 'संथाळ परगणा जमाबंदी विनियम, १८७२' (१८७२ चा ३)-कलम ३ द्वारे संथाळ परगण्यावर; 'खोंडमाळ विधि विनियम, १९३६' (१९३६ चा ४)-कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे खोंडमाळ जिल्ह्यावर; आणि 'अंगुल विधि विनियम, १९३६' (१९३६ चा ५)-कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे अंगुल जिल्ह्यावर विस्तारित करण्यात आला.

त्याचा विस्तार, १९६२ चा विनियम १२-कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे फेरबदलांसह गोवा, दमण आणि दीव यांवर, १९६३ चा विनियम ६-कलम २ आणि अनुसूची एक यांद्वारे दादरा व नगरहवेलीवर (१ जुलै, १९६५ रोजी व तेव्हापासून) आणि १९६३ चा विनियम ७-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे पांडेचरीवर (१ ऑक्टोबर, १९६३ रोजी व तेव्हापासून) विस्तारित करण्यात आला.

हा अधिनियम, 'अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४' (१८७४ चा १४) याच्या कलम ३ (क) खालील अधिसूचनेद्वारे पुढील अनुसूचित जिल्ह्यांना लागू करण्यात आला, ते असे:—पेंट राज्यक्षेत्र, पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८८७, भाग एक, पृ. १४४ (पेंट आता अनुसूचित जिल्हा राहिलेला नाही आणि मुंबई इलाखा शहराच्या नाशिक जिल्ह्यामध्ये अंमलात असलेल्या सर्व अधिनियमांपैकी १८६७ चा अधिनियम २५ या राज्यक्षेत्रात अंमलात आहे), पहा 'पेंट अधिनियम, १८९४' (१८९४ चा मुंबई अधिनियम २);

पेरीम बेट, पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८८७, भाग एक, पृ. ५; जलपैगुडी जिल्ह्याचा जो भाग पूर्वी जलपैगुडी उपविभाग होता आणि आता जलपैगुडी जिल्ह्याचा पश्चिम भाग होतो आणि पूर्वेकडे जो तिस्ता नदीपर्यंत विस्तारलेला आहे, तो भाग, दार्जिलिंग जिल्ह्यातील तिस्ता नदीच्या पश्चिमेकडील टेकड्या, दार्जिलिंग तराई, दार्जिलिंग जिल्ह्याचा दामसन उपविभाग, हजारीबाग, लोहारदाग [ हल्ली त्याला "रांची जिल्हा" असे म्हणतात, पहा, कलकत्ता गॅझेट, १८९९, भाग एक, पृ. ४४ ] आणि मानभूम हे जिल्हे आणि सिंगभूम जिल्ह्यातील परगणा धालभूम व कोल्हन, पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८८१, भाग एक, पृ. ७४ व ५०४; जलपैगुडी जिल्ह्यांची पश्चिम द्वारे, पहा, कित्ता, १९१०, भाग एक, पृ. ११६० ;

कुमाऊ आणि गढवाल जिल्हे, पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८७६, भाग एक, पृ. ६०५ ;

मिर्झापूर जिल्ह्याचा अनुसूचित भाग, पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८९७, भाग एक, पृष्ठ ३८२ ;

डेहराडून जिल्ह्यातील परगणा जौनसर बावर, पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८९७, भाग एक, पृष्ठ ३८२ ;

कामरूप, नौगाँग, दारांग, शिवसागर, लखिमपूर, गोलपारा (पूर्व द्वार वगळून) आणि काचर (उत्तर काचर टेकड्या वगळून) पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८७८, भाग एक, पृष्ठ ५३३ ;

गारो टेकड्या, खासी आणि जैंतिया टेकड्या, नागा टेकड्या, काचर जिल्ह्यातील उत्तर काचर टेकड्या आणि गोलपारा जिल्ह्यातील पूर्व द्वार, पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८९७, भाग एक, पृष्ठ २९९.

'अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४' (१८७४ चा १४) याच्या कलम ३ (ख) खालील अधिसूचनेद्वारे हा अधिनियम, पंजाबमधील लाहौल या अनुसूचित जिल्ह्यामध्ये अंमलात नसल्याचे जाहीर करण्यात आले, पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८८६, भाग एक, पृष्ठ ३०१.

'अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४' (१८७४ चा १४) याच्या कलम ५ खालील अधिसूचनेद्वारे, हा अधिनियम, आग्रा प्रांताच्या तराई जिल्ह्यावर (पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १८७६, भाग एक, पृष्ठ ५०६), कूर्ग जिल्ह्यावर विस्तारित करण्यात आला (पहा, कित्ता १९१८, भाग दोन, पृष्ठ १७३०) ; 'वऱ्हाड विधी अधिनियम, १९४१' (१९४१ चा ४) द्वारे वऱ्हाडवरही विस्तारित करण्यात आला.

पुढील क्षेत्रांना लागू करताना तो पुढील अधिनियमांद्वारे विशोधित करण्यात आला—

आंध्र येथे—१९६० चा आंध्र अधिनियम ८ द्वारे;

मद्रास येथे—१९४८ चा मद्रास अधिनियम २४ आणि १९६० चा १४ यांद्वारे; आणि

पंजाब येथे—१९४२ चा पंजाब अधिनियम १४, १९५० चा २५ आणि १९५७ चा १५ यांद्वारे.

२. १९५१ चा अधिनियम ३ आणि अनुसूची यांद्वारे "भाग ख राज्ये सोडून संपूर्ण भारतात" याऐवजी घातले.

३. १९५५ चा अधिनियम ५५-कलम २ द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

प्रास्ताविका. ज्याअर्थी, मुद्रणालये व [1][वृत्तपत्रे] यांचे विनियमन करण्यासाठी, [3][भारतात मुद्रित केलेले प्रत्येक पुस्तक व वृत्तपत्र] यांच्या [2]* * * प्रतींचे जतन करण्यासाठी [3][आणि अशा पुस्तकांची व वृत्तपत्रांची नोंदणी करण्यासाठी] उपबंध करणे समयोचित आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

## भाग १ ला

### प्रारंभिक

निर्वचन खंड. १. [7][(१)] या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

"पुस्तक" यामध्ये, कोणत्याही भाषेतील प्रत्येक ग्रंथ, ग्रंथाचा भाग किंवा विभाग, आणि पत्रक आणि स्वतंत्रपणे मुद्रित केलेले [4]* * * स्वरांकनपत्र, नकाशा, तक्ता किंवा आराखडा यांचा समावेश होतो;

[6]* * * * * * *

[12]["संपादक" याचा अर्थ, वृत्तपत्रात प्रकाशित होणाऱ्या साहित्याच्या निवडीवर नियंत्रण ठेवणारी व्यक्ती असा आहे;]

[8]* * * * * * *

"दंडाधिकारी" याचा अर्थ, [9]दंडाधिकाऱ्याच्या संपूर्ण शक्तींचा वापर करणारी कोणतीही व्यक्ती असा आहे, आणि त्यात पोलीस [10]दंडाधिकाऱ्याचा [11]* * * समावेश होतो;

[13]["वृत्तपत्र" याचा अर्थ, लोकवार्ता किंवा लोकवार्तेवरील टीकाटिप्पणी अंतर्भूत असलेले कोणतेही मुद्रित नियतकालिक असा आहे;]

[14]* * * * * * *

[5]["कालिक" याचा अर्थ, पुस्तकाहून अन्य असा वृत्तपत्रासुद्धा कोणताही दस्तऐवज असा आहे;

"विहित" याचा अर्थ, कलम २०क खाली केंद्र शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

"मुद्रण निबंधक" याचा अर्थ, कलम १९क खाली केंद्र शासनाने नियुक्त केलेला भारताचा वृत्तपत्रनिबंधक असा आहे आणि त्यात, मुद्रण निबंधकाची सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कार्ये पार पाडण्यासाठी केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो;

"मुद्रण" यात, चक्रमुद्रण आणि शिळाछापाचे मुद्रण यांचा समावेश होतो;

"नोंदवही" याच अर्थ, कलम १९ख खाली ठेवलेली 'वृत्तपत्र नोंदवही' असा आहे.]

---

१. १९५० चा अधिनियम ३५-कलम ३ आणि अनुसूची दोन यांद्वारे "वृत्तांचा समावेश असलेली कालिके" याऐवजी घातले.

२. १८९० चा अधिनियम १०-कलम १ द्वारे "तीन" हा शब्द गाळला.

३. १९५५ चा अधिनियम ५५-कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम ४ द्वारे "किंवा शिळामुद्रित केलेले" हा मजकूर गाळला (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

५. कित्ता—कलम ४ द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

६. 'अनुकूलन आदेश १९३७' द्वारे "ब्रिटिश इंडिया" याची व्याख्या निरसित केली. आता, 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७' (१८९७ चा १०) याच्या कलम ३ (५) मधील व्याख्या पहा.

७. १९६५ चा अधिनियम १६-कलम २ द्वारे कलम १ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला (१ नोव्हेंबर, १९६५ रोजी व तेव्हापासून).

८. कित्ता—कलम २ द्वारे "भारत" याची व्याख्या गाळली (१ नोव्हेंबर, १९६५ रोजी व तेव्हापासून).

९. आता प्रथम वर्ग दंडाधिकारी, पहा 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५).

१०. आता इलाखा शहर दंडाधिकारी, पहा, १८९८ चा अधिनियम ५.

११. १८९० चा अधिनियम १०-कलम २ द्वारे "आणि जस्टिस ऑफ दि पीस" हा उल्लेख निरसित केला.

१२. १९२२ चा अधिनियम १४-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे घातले.

१३. कित्ता—कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे घातले.

१४. १९१४ चा अधिनियम १०-कलम ३ आणि अनुसूची दोन यांद्वारे "संख्या" आणि "लिंग" यांच्या व्याख्यांसंबंधीचे परिच्छेद निरसित केले, 'अनुकूलन आदेश, १९४७' द्वारे "स्थानिक शासन" याची व्याख्या निरसित केली आणि अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे घातलेली "राज्ये" याची व्याख्या १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे निरसित केली.

[1][(२) जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात नसलेल्या ज्या कोणत्याही कायद्यासंबंधी या अधिनियमात निर्देश असेल त्याचा अर्थ, त्या राज्याच्या संबंधात, तेथे अंमलात असलेल्या तदनुरूप कायद्याचा निर्देश म्हणून लावला जाईल.]

२. [१८३५ चा अधिनियम क्रमांक ११ याचे निरसन.] 'निरसन अधिनियम, १८७०' (१८७० -१४)-कलम १ व अनुसूची-भाग दोन यांद्वारे निरसित.

## भाग २ रा

### मुद्रणालये आणि वृत्तपत्रे यांविषयी

**पुस्तके व कालिके यांवर मुद्रित करावयाचा तपशील.**

३. [2][भारतात] मुद्रित केलेल्या प्रत्येक पुस्तकावर किंवा कालिकावर मुद्रकाचे नाव व मुद्रणाचे स्थळ आणि (जर ते पुस्तक किंवा कालिक प्रकाशित करण्यात आले असेल तर) प्रकाशकाचे [3][नाव] व प्रकाशनस्थळ हे सुवाच्यपणे मुद्रित करावे लागेल.

**मुद्रणालयाच्या व्यवस्थापकाने अधिकथन करणे.**

४. [4][(१)] एखादे मुद्रणालय ज्याच्या स्थानिक अधिकारितेत असेल [5][तो जिल्ह्याचा, इलाखा शहराचा किंवा उपविभागाचा दंडाधिकारी] याच्यासमोर जी व्यक्ती पुढीलप्रकारे अधिकथन करून ते स्वाक्षरित करणार नाही अशा कोणाही व्यक्तीला [6][भारतामध्ये], पुस्तके किंवा कालिके यांच्या मुद्रणासाठी असे मुद्रणालय कब्जात ठेवता येणार नाही.

"मी, क. ख., असे अधिकथन करतो की, पुढील ठिकाणी माझे एक मुद्रणालय आहे-......."

आणि ही लगतपूर्व रिकामी जागा ज्या ठिकाणी असे मुद्रणालय असेल त्या ठिकाणचे यथातथ्य व नेमके वर्णन देऊन भरावी लागेल.

[5][(२) मुद्रणालय जेथे चालवले जात आहे ते स्थळ जेव्हा जेव्हा बदलण्यात येईल तेव्हा तेव्हा नवीन अधिकथन करावे लागेल:

परंतु, जेव्हा हा बदल जास्तीत जास्त साठ दिवस इतक्या कालावधीपुरता असेल आणि बदलानंतर मुद्रणालय जेथे चालवण्यात येत असेल ते स्थळ पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या दंडाधिकाऱ्याच्या स्थानिक अधिकारितेत असेल तेव्हा, जर-

(क) अशा बदलानंतर त्यासंबंधीचे निवेदन चोवीस तासांच्या आत उक्त दंडाधिकाऱ्याकडे सादर करण्यात आले तर, आणि

(ख) मुद्रणालयाचा व्यवस्थापक हा तोच राहणार असेल तर,

नवीन अधिकथनाची आवश्यकता असणार नाही.]

**वृत्तपत्रे प्रकाशित करण्याबाबतचे नियम.**

५. कोणतेही [7][वृत्तपत्र] यात यापुढे घालून देण्यात आलेल्या नियमांना सोडून अन्यथा [2][भारतात] प्रकाशित करता येणार नाही :-

[8][(१) कलम ३ च्या उपबंधांना बाध न येता, अशा प्रत्येक वृत्तपत्राच्या प्रत्येक प्रतीवर त्याच्या मालकाचे व संपादकाचे नाव व त्याच्या प्रकाशनाचा दिनांकदेखील स्पष्टपणे मुद्रित करावा लागेल.]

[9][(२)] अशा प्रत्येक [10][वृत्तपत्राचा] मुद्रक आणि प्रकाशक यांना, [6][ज्याच्या स्थानिक अधिकारितेत असे वृत्तपत्र मुद्रित किंवा प्रकाशित केले जाणार असेल [11]*** त्या जिल्हा दंडाधिकाऱ्यासमोर, इलाखा

---

१. १९६५ चा अधिनियम १६-कलम २ द्वारे घातले (१ नोव्हेंबर, १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे 'राज्ये' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १८९१ चा अधिनियम १२-कलम २ आणि अनुसूची दोन-भाग एक यांद्वारे घातले.

४. १९५५ चा अधिनियम ५५-कलम ५ द्वारे कलम ४ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

५. कित्ता-कलम ५ द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

६. १९५१ चा अधिनियम ५६-कलम ३६ द्वारे 'दंडाधिकारी' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ फेब्रुवारी, १९५२ रोजी व तेव्हापासून).

७. १९२२ चा अधिनियम १४-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे विशिष्ट शब्दांऐवजी घातले.

८. कित्ता-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे घातलेला नियम (१) याऐवजी १९६० चा अधिनियम २६-कलम २ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

९. कित्ता-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे नियम (१) ला नियम (२) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

१०. कित्ता-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे 'नियतकालिक' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

११. १९६० चा अधिनियम २६-कलम २ द्वारे "किंवा असा मुद्रक किंवा प्रकाशक राहत असेल" हे शब्द गाळले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

शहर दंडाधिकाऱ्यासमोर किंवा उपविभागीय दंडाधिकाऱ्यासमोर जातीने किंवा कलम २०] खाली केलेल्या नियमांनुसार याबाबत प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत] हजर व्हावे लागेल, आणि पुढीलप्रमाणे दोन प्रतींमध्ये आपल्या स्वाक्षरीनिशी अधिकथन करून द्यावे लागेल :—

"मी, क. ख., असे अधिकथन करतो की, ........ या नावाच्या [१][आणि ....... या ठिकाणी मुद्रित करावयाच्या किंवा प्रकाशित करावयाच्या अथवा, प्रकरणपरत्वे, मुद्रित करून प्रकाशित करावयाच्या] [६][वृत्तपत्राचा] मी मुद्रक (किंवा प्रकाशक किंवा मुद्रक व प्रकाशक) आहे."

अधिकथनाच्या या नमुन्यातील दुसरी रिकामी जागा ज्या ठिकाणी मुद्रण किंवा प्रकाशन चालवले जाते त्या ठिकाणाचा यथातथ्य व नेमका तपशील देऊन भरावी लागेल.

[२][(२क) नियम (२) खालील प्रत्येक अधिकथनामध्ये, वृत्तपत्राचे नाव, ज्या भाषेत ते प्रकाशित करावयाचे ती भाषा आणि त्याच्या प्रकाशनाचे नियतकालांतर विनिर्दिष्ट करावे लागेल आणि विहित करण्यात येईल असा अन्य तपशील त्यात अंतर्भूत असेल.]

[३][(२ख) जेव्हा नियम (२) खाली अधिकथन करणारा वृत्तपत्राचा मुद्रक किंवा प्रकाशक, त्या वृत्तपत्राचा मालक नसेल तेव्हा, त्या अधिकथनात मालकाचे नाव विनिर्दिष्ट करावे लागेल आणि त्याच्यासोबत, स्वाक्षरीनिशी असे अधिकथन करून देण्यासाठी अशा व्यक्तीला प्राधिकृत करणारे मालकाने दिलेले लेखी प्राधिकारपत्रही असेल.

(२ग) नियम (२) खाली केले जाणारे आणि कलम ६ खाली अधिप्रमाणित केले जाणारे वृत्तपत्रविषयक अधिकथन ते वृत्तपत्र प्रकाशित करण्यापूर्वी करून द्यावे लागेल.

(२घ) जेव्हा एखाद्या वृत्तपत्राचे नाव किंवा भाषा किंवा त्याच्या प्रकाशनाचे नियतकालांतर बदलण्यात येईल तेव्हा, ते अधिकथन परिणामक असण्याचे बंद होईल आणि त्या वृत्तपत्राचे प्रकाशन चालू ठेवण्यापूर्वी नवीन अधिकथन करून द्यावे लागेल.

(२ङ) जेव्हा जेव्हा वृत्तपत्राचा मालक बदलला जाईल तेव्हा तेव्हा, नवीन अधिकथन करून द्यावे लागेल.]

[७][(३)] जेव्हा जेव्हा मुद्रणाचे किंवा प्रकाशनाचे स्थळ बदलले जाईल तेव्हा तेव्हा, नवीन अधिकथन करून द्यावे लागेल :

[२][परंतु, जेव्हा हा बदल जास्तीत जास्त तीस दिवस इतक्या कालावधीपुरता असेल आणि त्या बदलानंतर मुद्रणाचे किंवा प्रकाशनाचे स्थळ कलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या दंडाधिकाऱ्याच्या स्थानिक अधिकारितेत असेल तेव्हा, जर—

(क) अशा बदलानंतर त्यासंबंधीचे निवेदन चोवीस तासांच्या आत उक्त दंडाधिकाऱ्याकडे सादर करण्यात आले तर; आणि

(ख) वृत्तपत्राचा मुद्रक किंवा प्रकाशक अथवा मुद्रक व प्रकाशक हा तोच राहणार असेल तर, नवीन अधिकथनाची आवश्यकता असणार नाही.]

[५][(४) पूर्वी सांगितल्याप्रमाणे ज्याला असे अधिकथन करावे लागेल तो मुद्रक किंवा प्रकाशक हा नव्वद दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी भारताबाहेर जाईल अथवा ज्या परिस्थितीत पद रिक्त करावे लागत नाही अशा परिस्थितीत विकलांगतेमुळे किंवा अन्य कारणांमुळे आपली कामे पार पाडण्यास नव्वद दिवसांहून अधिक कालावधीपर्यंत तो असमर्थ होईल तेव्हा तेव्हा, नवीन अधिकथन करून देणे आवश्यक ठरेल.]

[२][(५) जर, एखाद्या वृत्तपत्राचे प्रकाशन,—

(क) आठवड्यातून एकदा किंवा त्याहून अधिक वेळा प्रकाशित करावयाच्या वृत्तपत्राच्या बाबतीत [४][कलम ६ खाली अधिकथन अधिप्रमाणित केल्यापासून] सहा आठवड्यांच्या आत; आणि

(ख) अन्य कोणत्याही वृत्तपत्राच्या बाबतीत, [४][कलम ६ खाली अधिकथन अधिप्रमाणित केल्यापासून] तीन महिन्यांच्या आत,

सुरू झाले नाही तर, त्या वृत्तपत्राच्या संबंधात केलेले प्रत्येक अधिकथन रद्दबातल ठरेल आणि अशा प्रत्येक बाबतीत, ते वृत्तपत्र प्रकाशित होण्यापूर्वी नवीन अधिकथन करून द्यावे लागेल.]

---

१. १९५५ चा अधिनियम ५५-कलम ६ द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. किता—कलम ६ द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

३. १९६० चा अधिनियम २६-कलम २ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. किता—कलम २ द्वारे "अधिकथन केल्यापासून" या मजकुराऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. किता—कलम २ द्वारे नियम (४) ऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून); १९२२ चा अधिनियम १४—कलम ३ व अनुसूची एक यांद्वारे मूळ नियम (३) याला नियम (४) असा नवीन क्रमांक दिला होता.

६. १९२२ चा अधिनियम १४-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे "नियतकालिकाचा" याऐवजी घातले.

७. किता—कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे नियम (२) ला नियम (३) असा नवीन क्रमांक दिला.

(६) जर कोणत्याही तिमाही कालावधीत कोणत्याही दैनिक, त्रैसाप्ताहिक, द्विसाप्ताहिक, साप्ताहिक किंवा पाक्षिक वृत्तपत्राच्या संबंधात केलेल्या अधिकथनानुसार त्याचे जितके अंक प्रकाशित व्हावयास पाहिजे होते त्याच्या निम्म्यापेक्षा कमी अंक प्रकाशित झाले तर, ते अधिकथन परिणामक राहाणार नाही आणि वृत्तपत्राचे प्रकाशन पुढे चालू करण्यापूर्वी नवीन अधिकथन करून द्यावे लागेल.

(७) जेव्हा अन्य कोणत्याही वृत्तपत्राचे प्रकाशन बारा महिन्यांपेक्षा अधिक काळपर्यंत थांबलेले असेल तेव्हा, त्याबाबत केलेले प्रत्येक अधिकथन परिणामशून्य होईल आणि ते वृत्तपत्र पुन्हा प्रकाशित करण्यापूर्वी नवीन अधिकथन करून द्यावे लागेल.

(८) वृत्तपत्राबाबतचे प्रत्येक विद्यमान अधिकथन त्याच वृत्तपत्राबाबत ज्याच्यासमोर नवीन अधिकथन स्वाक्षरीनिशी करून देण्यात आले असेल त्या दंडाधिकाऱ्याकडून रद्द करण्यात येईल:]

[१][परंतु, [२][जी व्यक्ती सर्वसामान्यपणे भारतात राहात नाही, अथवा] जिला 'भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५' (१८७५ चा ९) याच्या किंवा सज्ञानता प्राप्त होण्याच्या संबंधात ती ज्या कायद्याला अधीन आहे त्याच्या उपबंधांनुसार सज्ञानता प्राप्त झालेली नाही अशा कोणत्याही व्यक्तीला या कलमाखाली विहित केलेले अधिकथन करून देण्यास परवानगी देण्यात येणार नाही, तसेच अशा कोणत्याही व्यक्तीला वृत्तपत्र संपादित करता येणार नाही.]

[३][५क. 'जम्मू व काश्मीर राज्य मुद्रण व प्रकाशने अधिनियम, सं. १९८९' (सं. १९८९ चा जम्मू व काश्मीर अधिनियम क्रमांक १) याच्या कलम ४ खाली ज्या व्यक्तीने कोणत्याही मुद्रणालयाच्या संबंधात एखादे अधिकथन स्वाक्षरीनिशी करून दिले असेल अशा कोणाही व्यक्तीला, या अधिनियमाच्या कलम ४ खाली त्या मुद्रणालयाच्या संबंधात तिने [४][३१ डिसेंबर, १९६८ ही तारीख उलटून जाण्यापूर्वी नवीन अधिकथन स्वाक्षरीनिशी करून दिले नाही तर, त्या तारखेनंतर] पुस्तके किंवा कालिके मुद्रित करण्यासाठी स्वतःचे मुद्रणालय ठेवता येणार नाही. **जम्मू व काश्मीरमधील मुद्रणालयांचे व्यवस्थापक आणि तेथील वृत्तपत्रांचे मुद्रक व प्रकाशक यांनी विनिर्दिष्ट कालावधीमध्ये नवीन अधिकथने स्वाक्षरीनिशी करून देणे.]**

(२) 'जम्मू व काश्मीर राज्य मुद्रण व प्रकाशने अधिनियम, सं. १९८९' याच्या कलम ५ खाली ज्या व्यक्तीने एखाद्या वृत्तपत्राच्या संबंधात कोणतेही अधिकथन स्वाक्षरीनिशी करून दिले असेल अशी प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाच्या कलम ५ मध्ये घालून दिलेल्या नियमांपैकी नियम (२) खाली, त्या वृत्तपत्राच्या संबंधात तिने [४][३१ डिसेंबर, १९६८ ही तारीख उलटून जाण्यापूर्वी नवीन अधिकथन स्वाक्षरीनिशी करून दिले नाही तर, त्या तारखेनंतर] अशा अधिकथनात नमूद केलेल्या वृत्तपत्राचा संपादक, मुद्रक किंवा प्रकाशक असण्याचे बंद होईल.]

**अधिकथनाचे अधिप्रमाणन.** ६. पूर्वी सांगितल्याप्रमाणे अशा तऱ्हेने स्वाक्षरीनिशी करून दिलेल्या प्रत्येक अधिकथनाच्या दोन मूळ प्रतींपैकी प्रत्येक प्रत, ज्या दंडाधिकाऱ्यासमोर उक्त अधिकथन करून देण्यात येईल त्याच्या स्वाक्षरीने व अधिकृत मोहोरेनिशी अधिप्रमाणित करण्यात येईल:

[५][परंतु, जेव्हा एखाद्या वृत्तपत्राच्या संबंधात कलम ५ खाली एखादे अधिकथन स्वाक्षरीनिशी करून देण्यात आले असेल तेव्हा, प्रकाशित करण्याचे ठरवलेल्या वृत्तपत्राला, त्याच भाषेत किंवा त्याच राज्यात प्रकाशित होणाऱ्या अन्य कोणत्याही वृत्तपत्राचेच किंवा तशासारखे नाव दिलेले नाही याबाबत [६][मुद्रण निबंधकाकडे चौकशी केल्यानंतर दंडाधिकाऱ्याची खात्री झाल्याखेरीज] ते अधिकथन, त्याच व्यक्तीची मालकी असलेल्या वृत्तपत्रांची बाब सोडून इतर बाबतीत, याप्रमाणे अधिप्रमाणित करण्यात येणार नाही.]

**निक्षेप.** उक्त मूळ प्रतींपैकी एक प्रत ही दंडाधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या दप्तरी निक्षेपित करण्यात येईल आणि दुसरी प्रत उच्च न्यायालयाच्या अथवा उक्त अधिकथन [७][जेथे करून देण्यात येईल त्या ठिकाणी किंवा मूळ अधिकारिता असलेल्या अन्य प्रधान दिवाणी न्यायालयाच्या] दप्तरी निक्षेपित करण्यात येईल.

**प्रतीचे निरीक्षण व पुरवठा.** प्रत्येक मूळ प्रत ज्याच्या अखत्यारात असेल तो अधिकारी कोणत्याही व्यक्तीला, एक रुपया फी भरून त्या मूळ प्रतीचे निरीक्षण करण्यास मुभा देईल, आणि अर्ज करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, तिने दोन रुपये फी भरल्यावर उक्त अधिकथनाची मूळ प्रत ज्या न्यायालयाच्या हवाली असेल त्या न्यायालयाच्या मोहोरेनिशी साक्षांकित केलेली त्याची प्रत देईल.

---

१. १९२२ चा अधिनियम १४-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे घातले.
२. १८९० चा अधिनियम १०-कलम ३ द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी घातले.
३. १९६५ चा अधिनियम १६-कलम ३ द्वारे घातले (१ नोव्हेंबर, १९६५ रोजी व तेव्हापासून).
४. १९६८ चा अधिनियम ३०-कलम २ द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी घातले (भूतलक्षी प्रभावासह).
५. १९५५ चा अधिनियम ५५-कलम ७ द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).
६. १९६० चा अधिनियम २६-कलम २ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).
७. कित्ता--कलम ३ द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

[1][दंडाधिकाऱ्याच्या अधिकृत मोहोरेनिशी साक्षांकित केलेली अधिकथनाची प्रत, किंवा अधिकथन अधिप्रमाणित करण्यास नकार देणाऱ्या आदेशाची प्रत, ते अधिकथन स्वाक्षरीनिशी करून देणाऱ्या व्यक्तीकडे आणि मुद्रण निबंधकाकडेदेखील शक्य तितक्या लवकर पाठवण्यात येईल.]

**अधिकथनाची कार्यालयीन प्रत हा प्रथमदर्शनी पुरावा असणे.**

७. कोणत्याही दिवाणी तसेच फौजदारी स्वरूपाच्या वैध कार्यवाहीत, अशी अधिकथने आपल्या ताब्यात ठेवण्याची शक्ती या अधिनियमाद्वारे ज्याला प्रदान करण्यात आली आहे अशा एखाद्या न्यायालयाच्या मोहोरेनिशी साक्षांकित केलेली अशा अधिकथनाची प्रत, [2][अथवा संपादकाच्या बाबतीत, ज्यावर संपादकाचे नाव म्हणून त्याचे नाव मुद्रित केलेले असेल त्या वृत्तपत्राची प्रत,] हजर केली जाणे म्हणजे (विरुद्ध शाबीत करण्यात आले नाही तर), ज्या व्यक्तीचे नाव अशा अधिकथनावर स्वाक्षरित करण्यात आले असेल [2][किंवा, प्रकरणपरत्वे, अशा वृत्तपत्रावर मुद्रित करण्यात आले असेल] ती व्यक्ती, ज्याचे नाव अधिकथनात उल्लेखिलेल्या [3][वृत्तपत्राच्या] नावाशी जुळेल अशा प्रत्येक [3][वृत्तपत्राच्या] प्रत्येक भागाचा (उक्त अधिकथनातील शब्दयोजना जशी असेल त्याप्रमाणे) मुद्रक किंवा प्रकाशक, अथवा मुद्रक व प्रकाशक [2][अथवा त्या वृत्तपत्राच्या ज्या अंकाची प्रत हजर करण्यात आली असेल त्या अंकाच्या प्रत्येक भागाचा संपादक] होती या गोष्टीचा पुरेसा पुरावा होय, असे त्या व्यक्तीपुरते समजण्यात येईल.

**अधिकथनावर सही केल्यानंतर ज्या व्यक्ती मुद्रक किंवा प्रकाशक म्हणून राहिलेल्या नसतील त्या व्यक्तींनी नवीन अधिकथन करून देणे.**

८. [4][जर कोणत्याही व्यक्तीने कलम ५ खाली एखाद्या वृत्तपत्राच्या संबंधात कोणतेही अधिकथन स्वाक्षरीनिशी करून दिले असून, कलम ६ खाली दंडाधिकाऱ्याने ते अधिकथन अधिप्रमाणित केले आणि मागाहून ती व्यक्ती अशा अधिकथनात उल्लेखिलेल्या वृत्तपत्राची मुद्रक किंवा प्रकाशक राहिली नाही तर, ती व्यक्ती कोणत्याही जिल्हा, इलाखा शहर किंवा उपविभागीय दंडाधिकाऱ्यासमोर हजर होईल, आणि पुढील अधिकथन दोन प्रतींमध्ये स्वाक्षरीनिशी करून देईल :—

"मी, क. ख., असे अधिकथन करतो की, मी ........ या नावाच्या वृत्तपत्राचा मुद्रक किंवा प्रकाशक अथवा मुद्रक आणि प्रकाशक राहिलेलो नाही".]

**अधिप्रमाणन आणि दप्तरदाखल करणे.**

नंतरच्या अधिकथनाची प्रत्येक मूळ प्रत ज्या दंडाधिकाऱ्यासमोर नंतरचे उक्त अधिकथन करण्यात आले असेल त्याच्या स्वाक्षरीने व मोहोरेनिशी अधिप्रमाणित करण्यात येईल, आणि नंतरच्या उक्त अधिकथनाची एक मूळ प्रत पूर्वीच्या अधिकथनाच्या प्रत्येक मूळ प्रतीबरोबर दप्तरदाखल करण्यात येईल.

**प्रतींचे निरीक्षण व पुरवठा.**

नंतरच्या अधिकथनाची प्रत्येक मूळ प्रत ज्याच्या अखत्यारात असेल तो अधिकारी अर्ज करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, एक रुपया फी भरून त्या मूळ प्रतीचे निरीक्षण करण्यास मुभा देईल, आणि अर्ज करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, तिने दोन रुपये फी भरल्यावर, नंतरच्या उक्त अधिकथनाची मूळ प्रत ज्या न्यायालयाच्या हवाली असेल त्या न्यायालयाच्या मोहोरेनिशी साक्षांकित केलेली त्याची प्रत देईल.

**प्रत पुराव्यात दाखल करणे**

ज्या संपरीक्षांमध्ये पूर्वी सांगितल्याप्रमाणे साक्षांकित केलेली पूर्वीच्या अधिकथनाची प्रत पुराव्यात दाखल करण्यात येईल त्या सर्व संपरीक्षांमध्ये नंतरच्या अधिकथनाची वर सांगितल्याप्रमाणे साक्षांकित केलेली प्रत पुराव्यात दाखल करणे कायदेशीर ठरेल, आणि पूर्वीचे अधिकथन हे अधिकथनकर्ता नंतरच्या अधिकथनाच्या दिनांकानंतर कोणत्याही वेळी त्यात उल्लेखिलेल्या [3][वृत्तपत्राचा] मुद्रक किंवा प्रकाशक होता याचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.

[1][दंडाधिकाऱ्याच्या अधिकृत मोहोरेनिशी साक्षांकित केलेली नंतरच्या अधिकथनाची प्रत मुद्रण निबंधकाकडे पाठवण्यात येईल.]

**[5][ज्या व्यक्तीचे नाव चुकीने संपादक म्हणून प्रकाशित करण्यात आले असेल त्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्यासमोर अधिकथन करून देता येईल.]**

[5][८क. संपादक म्हणून ज्या व्यक्तीचे नाव वृत्तपत्राच्या प्रतीवर दिसत असेल त्या व्यक्तीने ज्यावर आपले नाव याप्रमाणे आले आहे त्या अंकाचा संपादक आपण नव्हतो असा दावा केला तर, त्या व्यक्तीला आपले नाव अशा तऱ्हेने प्रकाशित झाल्याचे कळल्यापासून दोन आठवड्यांच्या आत जिल्हा, इलाखाशहर किंवा उपविभागीय दंडाधिकाऱ्यासमोर हजर होऊन, त्या अंकात याचा संपादक म्हणून आपले नाव चुकीने प्रकाशित झाले होते असे अधिकथन करता येईल, आणि आपणांस आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर किंवा चौकशी करवल्यानंतर जर असे अधिकथन खरे आहे याबद्दल दंडाधिकाऱ्याची खात्री पटली तर, तो तसे प्रमाणित करील आणि असे प्रमाणपत्र दिल्यानंतर, वृत्तपत्राच्या त्या अंकाबाबत त्या व्यक्तीला कलम ७ चे उपबंध लागू होणार नाहीत.

---

१. १९५५ चा अधिनियम ५५- कलम ७ द्वारे (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून) घातलेल्या चौथ्या परिच्छेदाऐवजी १९६० चा अधिनियम २६-कलम ३ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९२२ चा अधिनियम १४-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे घातले.

३. कित्ता—कलम ४ आणि अनुसूची एक यांद्वारे 'नियतकालिक' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

४. १९५५ चा अधिनियम ५५-कलम ८ द्वारे पहिल्या परिच्छेदाऐवजी घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

५. कित्ता—कलम ८ द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

या कलमाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अवधीत अशा व्यक्तीला हजर होऊन अधिकथन करणे पुरेशा कारणामुळे शक्य झाले नाही याबाबत दंडाधिकाऱ्याची खात्री पटली असेल अशा कोणत्याही बाबतीत त्याला तो अवधी वाढवता येईल.

[1][अधिकथन रद्द करणे.]

[1][८ख. मुद्रण निबंधक किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांनी अर्ज केल्यावरुन किंवा अन्यथा जर या अधिनियमाखाली अधिकथन अधिप्रमाणित करण्याची शक्ती प्रदान झालेल्या दंडाधिकाऱ्याचे एखाद्या वृत्तपत्राबाबत केलेले कोणतेही अधिकथन रद्द करावे असे मत पडले तर, संबंधित व्यक्तीला, करण्याचे योजलेल्या कारवाईविरुद्ध कारण दाखवण्याची संधी दिल्यानंतर त्याला त्या प्रकरणाबाबत चौकशी करता येईल, आणि अशा व्यक्तीने काही कारण दाखवल्यास ते विचारात घेऊन आणि त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर जर,—

(एक) ज्या वृत्तपत्राबाबत अधिकथन केले आहे, ते वृत्तपत्र या अधिनियमाचे उपबंध किंवा त्यांखाली केलेले नियम यांचे व्यतिक्रमण करून प्रकाशित करण्यात येत आहे; किंवा

(दोन) अधिकथनात उल्लेखिलेल्या वृत्तपत्राला त्याच भाषेत किंवा त्याच राज्यात प्रकाशित होणाऱ्या अन्य कोणत्याही वृत्तपत्राचेच किंवा तत्सम नाव दिलेले आहे; किंवा

(तीन) मुद्रक किंवा प्रकाशक हा अशा अधिकथनात उल्लेखिलेल्या वृत्तपत्राचा मुद्रक किंवा प्रकाशक म्हणून राहिलेला नाही; किंवा

(चार) खोटे अभिवेदन करून किंवा कोणतेही महत्त्वाचे तथ्य लपवून त्या आधारे किंवा जे वृत्तपत्र नाही अशा कोणत्याही नियतकालिकाच्या संदर्भात अधिकथन करून देण्यात आले होते,

अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर, तो दंडाधिकारी आदेशाद्वारे ते अधिकथन रद्द करू शकेल आणि त्या आदेशाची एकेक प्रत असे अधिकथन स्वाक्षरीनिशी करून देणाऱ्या व्यक्तीला आणि मुद्रण निबंधकालाही शक्य तितक्या लवकर पाठवील.]

[1][अपील.]

[1][८ग. (१) कलम ६ खाली अधिकथन अधिप्रमाणित करण्याचे नाकारणाऱ्या किंवा कलम ८ख खाली अधिकथन रद्द करणाऱ्या दंडाधिकाऱ्याच्या आदेशामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, ज्या दिनांकास असा आदेश तिला कळवण्यात येईल त्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत 'मुद्रण व नोंदणी अपील मंडळ' या नावाच्या अपील मंडळाकडे अपील दाखल करता येईल, आणि केंद्र शासनाने नियुक्त करावयाचा अध्यक्ष व दुसरा एक सदस्य मिळून ते मंडळ बनलेले असेल :

परंतु, अपील वेळीच दाखल करणे अपीलकर्त्याला पुरेशा कारणामुळे शक्य झाले नाही अशी अपील मंडळाची खात्री झाली तर, त्याला उक्त कालावधी संपल्यानंतरही अपील विचारार्थ स्वीकारता येईल.

(२) या कलमाखाली अपील आल्यावर अपील मंडळाला, ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश, दंडाधिकाऱ्याकडून कागदपत्रे मागवून आणि आपणांस योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करून नंतर कायम करता येईल, त्यात बदल करता येईल किंवा तो रद्द ठरवता येईल.

(३) पोटकलम (२) मध्ये समाविष्ट असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, अपील मंडळाला आदेशाद्वारे, आपला शिरस्ता व कार्यपद्धती यांचे विनियमन करता येईल.

(४) अपील मंडळाचा निर्णय अंतिम असेल.]

## [2][भाग ३ रा

### पुस्तके सादर करणे

अधिनियमाच्या प्रारंभानंतर मुद्रित केलेल्या पुस्तकांच्या प्रती शासनाला विनाशुल्क सादर करणे.

९. हा अधिनियम अंमलात येईल त्यानंतर [3][भारतात] जे जे पुस्तक मुद्रित[4] * * * होईल त्या प्रत्येक संपूर्ण पुस्तकाच्या मुद्रित [4]* * * प्रती व सोबत, तदानुषंगिक असे जे जे नकाशे, छापप्रती किंवा इतर कोरीव छाप त्यांपैकी सर्वोत्तम प्रतींप्रमाणे तशाच पद्धतीने परिष्कृत केलेले व रंगवलेले असतील ते सर्व, त्याचा मुद्रक व प्रकाशक यांच्यामध्ये (पुस्तक प्रकाशित होण्यावर अवलंबून) कोणताही करार झालेला असला तरीही, मुद्रकाला राज्य शासन वेळोवेळी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे

---

१. १९६० चा अधिनियम २६-कलम ४ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १८९० चा अधिनियम १०-कलम ४ द्वारे मूळच्या ३ऱ्या भागाऐवजी घातले.

३. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे 'राज्ये' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

४. १९५५ चा अधिनियम ५५-कलम ९ द्वारे "किंवा शिळामुद्रित" हे शब्द गाळले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

निदेशित करील अशा ठिकाणी व अशा अधिकाऱ्याकडे, आणि शासनाला काही खर्च पडू न देता, पुढीलप्रमाणे सादर करावे लागेल, ते म्हणजे असे--

(क) कोणत्याही बाबतीत असे कोणतेही पुस्तक मुद्रणालयातून ज्या दिवशी प्रथम बाहेर पडेल त्या दिवसापासून एका कॅलेंडर महिन्याच्या आत, त्याची एक प्रत, आणि,

(ख) अशा दिवसापासून एका कॅलेंडर वर्षाच्या आत, जर राज्य शासनाने मुद्रकाकडे अशा आणखी जास्तीत जास्त दोन प्रती पाठवण्याची मागणी केली तर, राज्य शासन ज्या दिवशी मुद्रकाकडे अशी मागणी करील त्याच्यानंतर एका कॅलेंडर महिन्याच्या आत, राज्य शासन निदेशित करील त्याप्रमाणे अशी दुसरी प्रत किंवा अशा अन्य दोन प्रती;

अशा तऱ्हेने सादर केलेल्या प्रती बांधलेल्या, शिवलेल्या किंवा टाचलेल्या असाव्यात आणि पुस्तकाच्या कोणत्याही प्रती ज्याच्यावर मुद्रित [1]* * * केल्या जातील अशा उत्तम कागदावर त्या मुद्रित केलेल्या असाव्यात.

मुद्रकाला नेमणारा प्रकाशक किंवा अशी अन्य व्यक्ती मुद्रकाला पूर्वोक्त आवश्यक गोष्टींचे अनुपालन करणे शक्य होण्यासाठी जरूर असतील ते सर्व पूर्वोक्तानुसार परिष्कृत केलेले व रंगवलेले नकाशे, छापप्रती व कोरीव छाप त्याला उक्त महिना संपण्यापूर्वी कोणत्याही वाजवी वेळी पुरवील.

या कलमाच्या पूर्व भागातील कोणतीही गोष्ट--

(एक) ज्या पुस्तकाच्या दुसऱ्या किंवा नंतरच्या आवृत्तीमध्ये अक्षर-मुद्रणात अथवा त्या पुस्तकाला आनुषंगिक असलेले नकाशे, छापप्रती किंवा इतर कोरीव छाप यात कोणतीही भर घातलेली नसून किंवा फेरबदल केलेले नसून ज्या पुस्तकाच्या पहिल्या किंवा एखाद्या पूर्वआवृत्तीची प्रत या अधिनियमाखाली सादर करण्यात आली असेल अशा पुस्तकाच्या त्या दुसऱ्या किंवा नंतरच्या आवृत्तीला, अथवा

(दोन) या अधिनियमाच्या कलम ५ मध्ये घालून दिलेल्या नियमांना धरून प्रकाशित केलेल्या कोणत्याही [3][वृत्तपत्राला]

लागू होणार नाही.

**कलम ९ खाली सादर केलेल्या प्रतींची पावती**

१०. ज्याच्याकडे लगतपूर्व कलमाखाली पुस्तकाची प्रत सादर करण्यात आली असेल तो अधिकारी मुद्रकाला त्याची लेखी पावती देईल.

**कलम ९ खाली सादर केलेल्या प्रतींची विल्हेवाट.**

११. या अधिनियमाच्या कलम ९ मधील पहिल्या परिच्छेदाच्या खंड (क) ला अनुसरून सादर केलेल्या प्रतीची, राज्य शासन वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे विल्हेवाट लावण्यात येईल.

उक्त परिच्छेदाच्या खंड (ख) ला अनुसरून सादर केलेली कोणतीही प्रत किंवा कोणत्याही प्रती [5][केंद्र शासनाकडे पाठवण्यात येतील].]

**[2][भारतामध्ये मुद्रित केलेल्या वृत्तपत्राच्या प्रती शासनाला विनाशुल्क सादर करणे.]**

[4][**११क.** [6][भारतातील] प्रत्येक वृत्तपत्राच्या मुद्रकाला अशा वृत्तपत्राचा प्रत्येक अंक प्रकाशित झाला की त्याच्या दोन प्रती राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निदेशित करील अशा ठिकाणी व अशा अधिकाऱ्याकडे आणि शासनाला काही खर्च पडू न देता सादर कराव्या लागतील.]

**[2][वृत्तपत्रांच्या प्रती मुद्रण निबंधकाला सादर करणे.]**

[2][**११ख.** या अधिनियमाखाली करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, भारतातील प्रत्येक वृत्तपत्राच्या प्रकाशकाला अशा वृत्तपत्राचा प्रत्येक अंक प्रकाशित झाला की त्याची एक प्रत मुद्रण निबंधकाला काही खर्च पडू न देता त्याच्याकडे सादर करावी लागेल.]

---

१. १९५५ चा अधिनियम ५५-कलम ९ द्वारे "किंवा शिळामुद्रित" हे शब्द गाळले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता--कलम १० द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

३. १९२२ चा अधिनियम १४-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे 'नियतकालिक' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

४. कित्ता--कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे घातले.

५. 'अनुकूलन आदेश, १९४८' द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी घातले.

६. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे 'राज्ये' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

## भाग ४ था

### दंड

**१२.** या अधिनियमाच्या कलम ३ मध्ये समाविष्ट असलेल्या नियमाला सोडून अन्यथा जो कोणी कोणतेही पुस्तक किंवा कालिक मुद्रित किंवा प्रकाशित करील तो दंडाधिकाऱ्यासमोर दोषी ठरल्यास, त्याला जास्तीत जास्त [1][दोन हजार] रुपयांपर्यंत द्रव्यदंड, किंवा जास्तीत जास्त [2][सहा महिने] इतक्या मुदतीचा साधा कारावास, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**कलम ३ मधील नियमाविरुद्ध असलेल्या मुद्रणाबद्दल दंड.**

**१३.** [9][या अधिनियमाच्या कलम ४ मधील कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करून] जो कोणी, पूर्वी सांगितल्याप्रमाणे असे कोणतेही मुद्रणालय आपल्या कब्जात ठेवील तो दंडाधिकाऱ्यासमोर दोषी ठरल्यास, त्याला जास्तीत जास्त [1][दोन हजार] रुपयांपर्यंत द्रव्यदंड, किंवा जास्तीत जास्त [2][सहा महिने] इतक्या मुदतीचा साधा कारावास, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**कलम ४ अनुसार आवश्यक असलेले अधिकथन न करता मुद्रणालय कब्जात ठेवण्याबद्दल दंड.**

**१४.** जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या प्राधिकारान्वये [10][कोणतेही अधिकथन किंवा] अन्य निवेदन] करताना, जे खोटे आहे, आणि जे एकतर खोटे असल्याचे स्वतःला माहीत आहे किंवा तसे स्वतः समजते अथवा ते खरे आहे असे स्वतः समजत नाही असे कोणतेही विधान करील ती व्यक्ती दंडाधिकाऱ्यासमोर दोषी ठरल्यास, तिला जास्तीत जास्त [1][दोन हजार] रुपयांपर्यंत द्रव्यदंड, आणि जास्तीत जास्त [2][सहा महिने] इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल.

**खोटे अधिकथन करण्याबद्दल शिक्षा.**

**१५.** [7][(१)] जो कोणी यात यापूर्वी घालून दिलेल्या नियमांना न अनुसरता कोणतेही [3][वृत्तपत्र] [6][संपादित], मुद्रित किंवा प्रकाशित करील अथवा जो कोणी एखाद्या [4][वृत्तपत्राच्या] संबंधात उक्त नियमांचे पालन करण्यात आलेले नाही हे माहीत असूनही [5][ते वृत्तपत्र] [6][संपादित,] मुद्रित किंवा प्रकाशित करील अथवा [6][संपादित], मुद्रित, किंवा प्रकाशित करवील तो दंडाधिकाऱ्यासमोर दोषी ठरल्यास, त्याला जास्तीत जास्त [1][दोन हजार] रुपयांपर्यंत द्रव्यदंड, किंवा जास्तीत जास्त [2][सहा महिने] इतक्या मुदतीचा कारावास, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**नियमांना न अनुसरता वृत्तपत्रे मुद्रित करणे किंवा प्रकाशित करणे याबद्दल दंड.**

[8][(२) जेव्हा पोटकलम (१) खाली वृत्तपत्राच्या संबंधात एखादा गुन्हा करण्यात येईल तेव्हा, दंडाधिकारी उक्त पोटकलमाखाली नेमलेली शिक्षा देऊन शिवाय त्या वृत्तपत्राच्या संबंधातील अधिकथनही रद्द करू शकेल].

[11][**१५क.** जी व्यक्ती कोणत्याही वृत्तपत्राचा मुद्रक किंवा प्रकाशक म्हणून राहिलेली नाही अशा कोणत्याही व्यक्तीने जर, कलम ८ अनुसार अधिकथन करून देण्यात कसूर केली किंवा त्या कामी उपेक्षा केली तर, ती दंडाधिकाऱ्यासमोर दोषी ठरल्यावर जास्तीत जास्त दोनशे रुपये इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.]

**[11][कलम ८ खाली अधिकथन करून देण्यात कसूर केल्याबद्दल दंड.]**

---

१. १९२२ चा अधिनियम १४-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे "पाच हजार" याऐवजी घातले.

२. कित्ता—कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे "दोन वर्षे" याऐवजी घातले.

३. कित्ता—कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे "यात यापूर्वी वर्णन केल्याप्रमाणे असे नियतकालिक" याऐवजी घातले.

४. कित्ता—कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे "अशा नियतकालिकाच्या" याऐवजी घातले.

५. कित्ता—कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे "ते नियतकालिक" याऐवजी घातले.

६. कित्ता—कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे घातले.

७. १९६० चा अधिनियम २६-कलम ५ द्वारे कलम १५ याला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

८. कित्ता—कलम ५ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

९. १९५५ चा अधिनियम ५५-कलम ११ द्वारे "या अधिनियमातील कलम ४ द्वारे आवश्यक केलेले असे कोणतेही अधिकथन केल्याशिवाय" या मजकुराऐवजी घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

१०. कित्ता—कलम १२ द्वारे "कोणतेही अधिकथन" याऐवजी घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

११. कित्ता—कलम १३ द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

¹[पुस्तके सादर न करण्याबद्दल किंवा मुद्रकाला नकाशे न पुरवण्याबद्दल दंड.

१६. या अधिनियमाच्या कलम ९ मध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही पुस्तकाच्या एखाद्या मुद्रकाने जर त्या कलमानुसार त्याच्या प्रती सादर करण्याबाबत उपेक्षा केली तर, अशा प्रत्येक कसुरीबद्दल, ज्या अधिकाऱ्याला त्या प्रती सादर करावयास हव्या होत्या त्याने किंवा याबाबत त्या अधिकाऱ्याकडून प्राधिकृत झालेल्या कोणत्याही व्यक्तीने अर्ज केला असता, ते पुस्तक जेथे मुद्रित झाले त्या ठिकाणी अधिकारिता असलेला दंडाधिकारी त्या त्या परिस्थितीत कसुरीबद्दलचा वाजवी दंड म्हणून ठरवील अशी जास्तीत जास्त पन्नास रुपये इतकी रक्कम आणि अशा रकमेच्या जोडीला, मुद्रकाने ज्या प्रती सादर करावयास हव्या होत्या त्यांचे मूल्य म्हणून दंडाधिकारी ठरवील अशी आणखी रक्कमही मुद्रकाला गमवावी लागून ती शासनाकडे जमा करावी लागेल.

जर अशा कोणत्याही मुद्रकाला नेमणाऱ्या कोणत्याही प्रकाशकाने किंवा अशा अन्य व्यक्तीने या अधिनियमातील कलम ९ च्या उपबंधांचे अनुपालन करणे मुद्रकाला शक्य होण्यासाठी आवश्यक असतील ते नकाशे, छापप्रती किंवा कोरीव छाप त्याला त्या कलमाच्या दुसऱ्या परिच्छेदात विहित केलेल्या पद्धतीने पुरविण्याबाबत उपेक्षा केली तर, अशा प्रत्येक कसुरीबद्दल पूर्वोक्त असा अर्ज आला असता पूर्वोक्त असा दंडाधिकारी त्या परिस्थितीत कसुरीबद्दलचा वाजवी दंड म्हणून ठरवील अशी जास्तीत जास्त पन्नास रुपये इतकी रक्कम आणि अशा रकमेच्या जोडीला, अशा प्रकाशकाने किंवा अन्य व्यक्तीने जे नकाशे, छापप्रती किंवा कोरीव छाप पुरवावयास हवे होते त्यांचे मूल्य म्हणून दंडाधिकारी ठरवील अशी आणखी रक्कमही अशा प्रकाशकाला किंवा अन्य व्यक्तीला गमवावी लागून शासनाकडे जमा करावी लागेल.

³[वृत्तपत्रांच्या प्रती शासनाला विनाशुल्क पुरवण्यात कसूर करण्याबद्दल दंड.]

³[१६क. ⁴[भारतात] प्रकाशित होणाऱ्या कोणत्याही वृत्तपत्राच्या मुद्रकाने जर कलम ११क अनुसार त्याच्या प्रती सादर करण्याबाबत उपेक्षा केली तर, ज्या अधिकाऱ्याकडे प्रती सादर करावयास हव्या होत्या त्याने किंवा याबाबत त्याच्याकडून प्राधिकृत झालेल्या कोणत्याही व्यक्तीने तक्रार केली असता ते वृत्तपत्र जेथे मुद्रित करण्यात आले होते त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याने मुद्रकाला दोषी ठरवल्यावर, तो प्रत्येक कसुरीबद्दल पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.]

⁵[वृत्तपत्रांच्या प्रती मुद्रण निबंधकाला पुरवण्यात कसूर करण्याबद्दल दंड.]

⁵[१६ख. भारतात प्रकाशित होणाऱ्या कोणत्याही वृत्तपत्राच्या कोणत्याही प्रकाशकाने जर, कलम ११ख अनुसार त्याच्या प्रती सादर करण्याबाबत उपेक्षा केली तर, मुद्रण निबंधकाने तक्रार केली असता, ते वृत्तपत्र जेथे मुद्रित करण्यात आले होते त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याने प्रकाशकाला दोषी ठरवल्यावर, तो प्रत्येक कसुरीबद्दल पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.]

गमावणीपात्र रकमांची वसुली आणि त्या रकमांची व द्रव्यदंडांची विल्हेवाट.

१७. ⁶[कलम १६] खाली गमावणीपात्र ठरून शासनाकडे जाणाऱ्या कोणत्याही रकमेची वसुली ती रक्कम ठरवणाऱ्या दंडाधिकाऱ्याच्या अथवा त्याच्या पदीय उत्तराधिकाऱ्याच्या वॉरंटान्वये त्याकाळी अंमलात असणाऱ्या ⁷"फौजदारी प्रक्रिया संहिता' (१८८२ चा १०) याद्वारे प्राधिकृत केलेल्या पद्धतीने आणि द्रव्यदंडाच्या वसुलीसाठी 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये करता येईल.

⁸* * * * * ]

## भाग ५ वा

### पुस्तकांची नोंदणी

पुस्तकांच्या टाचणांची नोंदणी.

१८. राज्य शासन याबाबत नियुक्त करील अशा कार्यालयात व अशा अधिकाऱ्याला ⁴[भारतात] मुद्रित झालेल्या ग्रंथांची सूची म्हणून संबोधावयाचे असे एक पुस्तक ठेवावे लागेल, आणि त्यामध्ये या अधिनियमाच्या ²[कलम ९ च्या पहिल्या परिच्छेदातील खंड (क) अनुसार] जे जे पुस्तक सादर करण्यात आले असेल अशा प्रत्येक पुस्तकाचे टाचण नोंदवण्यात येईल. अशा टाचणात (व्यवहार्य असेल त्या मर्यादेपर्यंत) पुढील तपशील समाविष्ट असेल (तो म्हणजे) :—

(१) पुस्तकाचे नाव आणि मुखपृष्ठावरील मजकूर, तसेच जेव्हा असे नाव व मजकूर इंग्रजी भाषेत नसेल तेव्हा त्याचे इंग्रजी भाषांतर;

(२) पुस्तक ज्या भाषेत लिहिले आहे ती भाषा;

---

१. १८९० चा अधिनियम १०-कलम ५ द्वारे पूर्वीची कलमे १६ व १७ याऐवजी घातले.
२. कित्ता—कलम ६ द्वारे "कलम ९ अनुसार" याऐवजी घातले.
३. १९२२ चा अधिनियम १४-कलम ३ आणि अनुसूची एक यांद्वारे घातले.
४. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे 'राज्ये' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.
५. १९५५ चा अधिनियम ५९-कलम १४ द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).
६. १९२३ चा अधिनियम ११-कलम २ आणि अनुसूची एक यांद्वारे 'लगतपूर्वीचे कलम' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.
७. आता 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) पहा.
८. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे दुसरा परिच्छेद निरसित केला.

(३) पुस्तकाच्या किंवा पुस्तकाच्या कोणत्याही भागाच्या लेखकाचे, भाषांतरकर्त्याचे अथवा संपादकाचे नाव ;

(४) विषय ;

(५) मुद्रणस्थळ व प्रकाशनस्थळ ;

(६) मुद्रकाचे किंवा मुद्रक भागीदारी संस्थेचे नाव आणि प्रकाशकाचे किंवा प्रकाशक भागीदारी संस्थेचे नाव ;

(७) मुद्रणालयातून बाहेर पडल्याचा किंवा प्रकाशित झाल्याचा दिनांक ;

(८) ताव, पाने किंवा पृष्ठे यांची संख्या ;

(९) आकारमान ;

(१०) आवृत्ती पहिली, दुसरी किंवा जितक्या क्रमांकाची असेल तो क्रमांक ;

(११) आवृत्तीमध्ये समाविष्ट असलेल्या प्रतींची संख्या ;

(१२) पुस्तक मुद्रित [१][, चक्रमुद्रित किंवा शिळामुद्रित] आहे की काय ;

(१३) जनतेला ते पुस्तक कोणत्या किंमतीला विकले जाते ; आणि

(१४) कॉपीराइटच्या किंवा अशा कॉपीराइटच्या कोणत्याही भागाच्या मालकाचे नाव व राहण्याचे ठिकाण.

प्रत्येक पुस्तकाच्या बाबतीत [३][कलम ९ च्या पहिल्या परिच्छेदाचा खंड (क) याच्या अनुसार त्याची प्रत] सादर करण्यात आल्यानंतर व्यवहार्य असेल तितक्या लवकर, असे टाचण तयार करण्यात येऊन ते नोंदवण्यात येईल. * * * *

१९. प्रत्येक तिमाहीत उक्त ग्रंथसूचीमध्ये नोंदणी केलेली टाचणे अशा तिमाहीच्या अखेरीनंतर होईल तितक्या लवकर **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करण्यात येतील, आणि अशा तऱ्हेने प्रकाशित केलेल्या टाचणांची एक प्रत [५]* * * * * केंद्र शासनाकडे पाठवण्यात येईल. **नोंदणी केलेल्या टाचणांचे प्रकाशन.**

[२][भाग ५ वा–क

**वृत्तपत्रांची नोंदणी**

१९क. केंद्र शासनाला भारताच्या वृत्तपत्र निबंधकाची आणि मुद्रण निबंधकाचे सर्वसाधारण अधीक्षण आणि नियंत्रण यांखाली जे अधिकारी या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली त्यांच्याकडे सोपवण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा अन्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल, आणि या अधिनियमाखाली त्यांनी पार पाडावयाच्या कार्यांचे वाटप करण्यासाठी किंवा ती नेमून देण्यासाठी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे व्यवस्था करता येईल **मुद्रण निबंधक व अन्य अधिकारी यांची नियुक्ती.**

१९ख. (१) मुद्रण निबंधक विहित पद्धतीने वृत्तपत्रांची नोंदवही ठेवील. **वृत्तपत्रांची नोंदवही.**

(२) या नोंदवहीमध्ये, भारतात प्रकाशित झालेल्या प्रत्येक वृत्तपत्राबाबत, व्यवहार्य असेल त्या मर्यादेपर्यंत पुढील तपशील अंतर्भूत असेल, तो असा :—

(क) वृत्तपत्राचे नाव;

(ख) वृत्तपत्र ज्या भाषेत प्रकाशित होते ती भाषा ;

(ग) वृत्तपत्राच्या प्रकाशनाचे नियतकालांतर ;

(घ) वृत्तपत्राच्या संपादकाचे, मुद्रकाचे आणि प्रकाशकाचे नाव ;

(ङ) मुद्रणाचे व प्रकाशनाचे स्थळ ;

(च) प्रत्येक आठवड्याची सरासरी पृष्ठसंख्या ;

(छ) वर्षातून किती वेळा प्रकाशित होते त्या दिवसांची संख्या ;

(ज) मुद्रित केलेल्या प्रतींची सरासरी संख्या, जनतेला विकलेल्या प्रतींची सरासरी संख्या आणि जनतेला मोफत वाटलेल्या प्रतीची सरासरी संख्या—ही सरासरी विहित असेल अशा कालावधीच्या संदर्भात काढलेली असेल ;

(झ) प्रत्येक प्रतीची किरकोळ विक्रीची किंमत ;

---

१. १९५५ चा अधिनियम ५५-कलम १५ द्वारे "किंवा शिळामुद्रित" याऐवजी घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५५ चा अधिनियम ५५-कलम १६ द्वारे कलमे १९ क ते १९ ठ यांचा समावेश असलेला भाग ५ वा-क घातला.

३. १८९० चा अधिनियम १०-कलम ६ द्वारे "पूर्वोक्त पद्धतीने त्याच्या प्रती" याऐवजी घातले.

४. १९१४ चा अधिनियम ३-कलम १५ आणि अनुसूची दोन यांद्वारे कलम १८ चे अखेरचे वाक्य निरसित केले.

५. 'अनुकूलन आदेश १९४८' द्वारे "अनुक्रमे भारत मंत्र्याकडे आणि" हा मजकूर गाळला.

(ञ) वृत्तपत्राच्या मालकांची नावे व पत्ते आणि विहित करण्यात येईल असा मालकीसंबंधातील अन्य तपशील ;

(ट) विहित करण्यात येईल असा अन्य कोणताही तपशील.

(३) वर सांगितलेल्या तपशिलाबाबत वेळोवेळी माहिती मिळाल्यावर, मुद्रण निबंधक नोंदवहीत संबद्ध नोंदी करवील आणि नोंदवही अद्ययावत ठेवण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे त्यांत फेरबदल किंवा दुरुस्त्या करू शकेल.

**नोंदणी प्रमाणपत्रे.** १९ग. कलम ६ खाली दंडाधिकाऱ्याकडून वृत्तपत्राच्या संबंधातील अधिकथनाची एक प्रत मिळाल्यावर [1][आणि अशा वृत्तपत्राचे प्रकाशन झाल्यावर, मुद्रण निबंधक,] त्यानंतर व्यवहार्य असेल तितक्या लवकर, त्या वृत्तपत्राच्या संबंधात त्याच्या प्रकाशकाला नोंदणी प्रमाणपत्र [1][देईल].

**वृत्तपत्रांनी वार्षिक विवरण, इ. सादर करणे.** १९घ. (क) वृत्तपत्राच्या संबंधात विहित करण्यात येईल अशा वेळी आणि कलम १९ख च्या पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी तसा विहित तपशील अंतर्भूत असलेले वार्षिक विवरण मुद्रण निबंधकाकडे सादर करणे ;

(ख) मुद्रण निबंधक यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा वेळी आणि कलम १९ख च्या पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी वृत्तपत्रासंबंधीचा तसा विहित तपशील वृत्तपत्रात प्रकाशित करणे,

हे प्रत्येक वृत्तपत्राच्या प्रकाशकाचे कर्तव्य असेल.

**वृत्तपत्रांनी प्रतिवेदने व अहवाल सादर करणे.** १९ङ. कलम १९ख च्या पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणत्याही तपशिलासंबंधी मुद्रण निबंधक वेळोवेळी मागवील अशी प्रतिवेदने, आकडेवारी आणि अन्य माहिती प्रत्येक वृत्तपत्राच्या प्रकाशकाला मुद्रण निबंधकाकडे सादर करावी लागेल.

**अभिलेख व दस्तऐवज पाहण्याचा अधिकार.** १९च. या अधिनियमाखाली वृत्तपत्राच्या संबंधातील कोणतीही माहिती गोळा करण्यासाठी मुद्रण निबंधक किंवा याबाबत त्याने लेखी प्राधिकृत केलेला कोणताही राजपत्रित अधिकारी याला, वृत्तपत्राच्या संबंधातील त्याच्या प्रकाशकाच्या कब्जात असलेला कोणताही संबद्ध अभिलेख किंवा दस्तऐवज पहावयास मिळण्याचा हक्क असेल, आणि जेथे असा अभिलेख किंवा दस्तऐवज आहे असा त्याचा समज असेल अशा कोणत्याही वास्तूमध्ये तो कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करू शकेल आणि संबद्ध अभिलेखांचे किंवा दस्तऐवजांचे निरीक्षण करू शकेल किंवा त्यांच्या नकला घेऊ शकेल अथवा या अधिनियमाखाली सादर करावी लागणारी कोणतीही माहिती मिळवण्यासाठी आवश्यक असलेला कोणताही प्रश्न विचारू शकेल.

**वार्षिक अहवाल.** १९छ. मुद्रण निबंधक दर वर्षी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळी वार्षिक अहवाल तयार करील व त्यामध्ये भारतातील वृत्तपत्रांच्या संबंधी आधीच्या वर्षात त्याने मिळविलेल्या माहितीचा सारांश आणि अशा वृत्तपत्रांच्या कामकाजाचा वृत्तांत दिलेला असेल, आणि त्याच्या प्रती केंद्र शासनाकडे पाठवण्यात येतील.

**नोंदवहीतील उताऱ्यांच्या नकला पुरवणे.** १९ज. नोंदवहीतील कोणत्याही उताऱ्याची नक्कल पुरवण्यासाठी एखाद्या व्यक्तीने अर्ज केल्यावर आणि विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात आल्यावर, मुद्रण निबंधक, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा पद्धतीने अर्जदाराला अशी नक्कल पुरवील.

**शक्तींचे प्रत्यायोजन.** १९झ. या अधिनियमातील व त्याखाली केलेल्या विनियमांतील उपबंधांच्या अधीनतेने, मुद्रण निबंधक या अधिनियमाखालील आपल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही शक्ती आपणांस दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करू शकेल.

**मुद्रण निबंधक व अन्य अधिकारी हे लोकसेवक असणे.** १९ञ. या अधिनियमाखाली नियुक्त केलेले मुद्रण निबंधक व सर्व अधिकारी हे 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**कलम १९घ किंवा कलम १९ङ, इ. च्या व्यतिक्रमणाबद्दल दंड.** १९ट. जर कोणत्याही वृत्तपत्राच्या प्रकाशकाने,—

(क) कलम १९घ किंवा कलम १९ङ याच्या उपबंधांचे अनुपालन करण्यास नकार दिला किंवा त्याकामी उपेक्षा केली तर; किंवा

[2]* * * * * * * *

(ग) एखाद्या वृत्तपत्राच्या संबंधातील जो तपशील खोटा आहे असे समजण्यास त्याला कारण आहे असा कोणताही तपशील कलम १९घ-खंड (ख) ला अनुसरून वृत्तपत्रात प्रकाशित केला तर,

तो प्रकाशक पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

---

१. १९६० चा अधिनियम २६-कलम ६ द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ७ द्वारे खंड (ख) गाळला (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

१९ठ. जर या अधिनियमाखाली माहिती गोळा करण्यासंबंधीच्या कामात गुंतलेल्या कोणत्याही व्यक्तीने, ती या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये पार पाडीत असेल तेव्हाची बाब सोडून अथवा या अधिनियमाखालील किंवा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याखालील गुन्ह्याबाबतच्या खटल्याचे प्रयोजन सोडून एरव्ही, या अधिनियमाखाली देण्यात आलेली कोणतीही माहिती किंवा सादर करण्यात आलेल्या कोणत्याही प्रतिवेदनाचा तपशील यांची बुद्धिपुरःसर वाच्यता केली तर, ती व्यक्ती सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.] **माहितीचीअनुचित रीत्या वाच्यता करण्याबद्दल दंड.**

## भाग ६ वा

## संकीर्ण

२०. या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असतील असे [1][कलम २०क खाली केंद्र शासनाने केलेल्या नियमांशी विसंगत नसलेले] नियम करण्याची आणि वेळोवेळी असे नियम निरसित करण्याची, त्यांत फेरफार करण्याची आणि भर घालण्याची शक्ती राज्य शासनाला असेल. **नियम करण्याची शक्ती.**

असे सर्व नियम आणि त्यांची सर्व निरसने, त्यांत केलेले फेरफार आणि त्यांत घातलेली भर हे **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करण्यात येईल. **प्रकाशन.**

[2][ २०क. (१) केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील प्रकारचे म्हणजे,-- **[2][केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.]**

(क्) कलम ५ खाली स्वाक्षरीनिशी करून देण्यात आलेल्या अधिकथनात कोणता तपशील समाविष्ट असावा [3][आणि वृत्तपत्राचा मुद्रक, प्रकाशक, मालक व संपादक यांची नावे व त्याच्या मुद्रणाचे व प्रकाशनाचे स्थळ हे अशा वृत्तपत्राच्या प्रत्येक प्रतीवर कोणत्या नमुन्यात व कोणत्या पद्धतीने मुद्रित केले जावे ते विहित करणारे];

[4][(ख्) दंडाधिकाऱ्याच्या अधिकृत मोहोरेनिशी साक्षांकित केलेल्या कोणत्याही अधिकथनाच्या प्रती किंवा एखादे अधिकथन अधिप्रमाणित करण्यास नकार देणाऱ्या कोणत्याही आदेशाच्या प्रती, ते अधिकथन स्वाक्षरीनिशी करून देणाऱ्या व्यक्तीकडे व मुद्रण निबंधकाकडे कोणत्या पद्धतीने पाठवाव्यात ते विहित करणारे;]

(ग्) कोणत्या पद्धतीने कलम ११ख खाली कोणत्याही वृत्तपत्राच्या प्रती मुद्रण निबंधकाकडे पाठवाव्यात ते विहित करणारे;

(घ्) कोणत्या पद्धतीने कलम १९ख खालील नोंदवही ठेवावी व त्यामध्ये कोणता तपशील अंतर्भूत असावा ते विहित करणारे;

(ङ) वृत्तपत्राच्या प्रकाशकाने मुद्रण निबंधकाला सादर करावयाच्या वार्षिक विवरणामध्ये कोणता तपशील अंतर्भूत असावा ते विहित करणारे;

(च) कलम १९घ च्या खंड (क्) खालील वार्षिक विवरण अथवा कलम १९ङ खालील कोणतीही प्रतिवेदने, आकडेवारी किंवा अन्य माहिती हे मुद्रण निबंधकाकडे कोणत्या नमुन्यात व कोणत्या पद्धतीने सादर करावे ते विहित करणारे;

(छ) नोंदवहीतील उताऱ्यांच्या नकला पुरवण्याबद्दल द्यावयाची फी आणि कोणत्या पद्धतीने त्या नकला पुरवण्यात याव्यात ते विहित करणारे;

(ज्) वृत्तपत्राच्या संबंधातील नोंदणी प्रमाणपत्र कोणत्या पद्धतीने द्यावे ते विहित करणारे;

(झ्) कोणत्या नमुन्यात व किती मुदतीत मुद्रण निबंधकाने वार्षिक अहवाल तयार करून केंद्र शासनाकडे पाठवावेत ते विहित करणारे,

नियम करता येतील.

[5][(२) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि ज्या सत्रात तो याप्रमाणे ठेवला गेला ते सत्र किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

[6][ २०ख. या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाखाली केलेल्या कोणत्याही नियमात, त्याचे व्यतिक्रमण हे शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल असा उपबंध करता येईल.] **[6][या अधिनियमाखाली केलेल्या नियमांत, त्यांचे व्यतिक्रमण झाल्यास दंड करण्याचा उपबंध करता येईल.]**

---

१. १९५५ चा अधिनियम ५५-कलम १७ द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).
२. कित्ता--कलम १८ द्वारे घातले (१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).
३. कित्ता--कलम ८ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).
४. कित्ता--कलम ८ द्वारे खंड (ख) ऐवजी घातला (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).
५. कित्ता--कलम ८ द्वारे पोट-कलम (२) ऐवजी घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).
६. कित्ता--कलम ९ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

अधिनियमाच्या प्रवर्तनापासून पुस्तकांचा एखादा वर्ग वगळण्याची शक्ती.

२१. [1][राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे] या संपूर्ण अधिनियमाच्या अथवा त्यातील कोणत्याही भागाच्या किंवा भागांच्या प्रवर्तनातून पुस्तकांचा [2][किंवा कालिकांचा] कोणताही वर्ग वगळू शकेल :

[3][परंतु, वृत्तपत्रांच्या कोणत्याही वर्गाच्या संबंधात अशी कोणतीही अधिसूचना केंद्र शासनाशी विचार-विनिमय केल्याशिवाय काढता येणार नाही.]

[4][विस्तार.]

[4][२२. या अधिनियमाचा विस्तार [5]* * * * संपूर्ण भारतभर आहे.]

२३. [अधिनियमाचा प्रारंभ.] 'निरसन अधिनियम, १८७०' (१८७० चा १४)-कलम १ व अनुसूची-भाग दोन यांद्वारे निरसित.

## मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७--महाराष्ट्र विशोधन अधिनियम

### मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९४८[7]

### (१९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१)[6]

[३ डिसेंबर, १९४८]

'मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७' हा मुंबई प्रांतात लागू करताना त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी**, 'मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७' (१८६७ चा २५) हा मुंबई प्रांतात लागू करताना त्यामध्ये, यात यापुढे येणाऱ्या प्रयोजनासाठी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास 'मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९४८' असे म्हणता येईल.

१८६७ चा अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ९ ची सुधारणा.

२. 'मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७' (१८६७ चा २५) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधलेला) याच्या कलम ९ मध्ये,—

(क) समास टीपेमध्ये "शासनाला" या शब्दानंतर "आणि अधिसूचित ग्रंथालयांना" या शब्दांची भर घालण्यात येईल ; आणि

(ख) पहिल्या परिच्छेदानंतर पुढील नवीन परिच्छेद समाविष्ट करण्यात येईल :—

"असे कोणतेही पुस्तक मुद्रणालयातून ज्या दिवशी प्रथम बाहेर पडेल त्या दिवसापासून एका कॅलेंडर महिन्याच्या आत मुद्रकाला पुस्तकाच्या जास्तीत जास्त पाच प्रती, प्रांतिक सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा सार्वजनिक ग्रंथालयांकडे त्यांना काही खर्च पडू न देता पाठवाव्या लागतील.".

१८६७ चा अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम १० ची सुधारणा.

३. उक्त अधिनियमाच्या कलम १० मध्ये, "तो अधिकारी" या शब्दानंतर "किंवा, प्रकरणपरत्वे, ग्रंथालयांची प्रभारी व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

१८६७ चा अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम १६ ची सुधारणा.

४. उक्त अधिनियमाच्या कलम १६ मध्ये,—

(क) "अर्ज केला असता" या शब्दानंतर "किंवा ग्रंथालयाची प्रभारी असलेल्या ज्या व्यक्तीकडे पुस्तकाची एक प्रत सादर करावयास पाहिजे होती त्या व्यक्तीने अर्ज केला असता" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील; आणि

(ख) "दुसऱ्या" या शब्दाऐवजी "तिसऱ्या" हा शब्द दाखल करण्यात येईल.

---

१. 'अनुकूलन आदेश १९३७' द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी घातले.
२. १९१५ चा अधिनियम ११-कलम २ आणि अनुसूची एक यांद्वारे घातले.
३. १९६० चा अधिनियम २६-कलम १० द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९६० रोजी व तेव्हापासून).
४. १९५५ चा अधिनियम ५५-कलम १९ द्वारे घातले (१ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून). मूळचे कलम २२ हे १८९० चा अधिनियम १०-कलम ७ द्वारे निरसित केले होते.
५. १९६५ चा अधिनियम १६-कलम ४ द्वारे "जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीजकरून" हे शब्द गाळले (१ नोव्हेंबर, १९६५ रोजी व तेव्हापासून).
६. उद्देश व कारण यांच्या निवेदनासाठी, पहा, **मुंबई सरकार राजपत्र**, १९४८, भाग ५ वा, पृष्ठ ४२६.
७. १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ द्वारे उर्वरित राज्यात लागू केला.

## मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९५१[२]

## (१९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६)[१]

[ १४ एप्रिल, १९५१ ]

'मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७' हा मुंबई राज्यात लागू करताना त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, 'मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७' (१८६७ चा २५) हा महाराष्ट्र राज्यात लागू करताना त्यामध्ये, यात यापुढे येणाऱ्या प्रयोजनांसाठी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास 'मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९५१' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव.**

२. 'मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७' (१८६७ चा २५) याच्या कलम ११क मध्ये, "दोन" या शब्दाऐवजी "तीन" हा शब्द घालण्यात येईल. **१८६७ चा अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ११क ची सुधारणा.**

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, पहा, **मुंबई सरकार राजपत्र**, १९५१, भाग ५ बा, पृष्ठ ३१.

२. १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ द्वारे उर्वरित राज्यात लागू केला.

## THE PRESS AND REGISTRATION OF BOOKS ACT, 1867
## मुद्रण आणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७
### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| account | तपशील | .. [S. 5 (2)] |
| book | पुस्तक | .. [S. 1 (1)] |
| Catalogue of Books | ग्रंथांची सूची | .. [S. 18] |
| chart | तक्ता | .. [S. 1 (1)] |
| cyclostyling | चक्रमुद्रण | .. [S. 1(1)-8th para.] |
| declaration | अधिकथन | .. [S. 5 (2)] |
| delivery | सादर करणे | .. [Part III-heading] |
| deposit | निक्षेप | .. [S. 6-3rd para.] |
| edition | आवृत्ति | .. [S. 9 (*i*)] |
| editor | संपादक | .. [S. 1(1)-2nd para.] |
| engravings | कोरीव छाप | [S. 9] |
| finished and coloured | परिष्कृत केलेले व रंगवलेले | .. [S. 9] |
| firm | भागीदारी संस्था | .. [S. 18 (6)] |
| forfeitures | गमावणीपात्र रकमा | .. [S. 17] |
| keeper of printing press | मुद्रणालय व्यवस्थापक | [S. 4-m.n.] |
| leaves | पाने | .. [S. 18 (8)] |
| letter-press | अक्षर-मुद्रण | .. [S. 9 (*i*)] |
| make and subscribe a declaration | स्वाक्षरीनिशी अधिकथन करून देणे | .. [S. 5 (2)] |
| map | नकाशा | .. [S. 1 (1)] |
| memorandum | टाचण | .. [S. 18] |
| newspaper | वृत्तपत्र | [S. 1(1)-4th para.] |
| pages | पृष्ठे | .. [S. 18 (8)] |
| pamphlet | पत्रक | .. [S. 1 (1)] |
| paper | कालिक | .. [S. 1 (1)-5th para.] |
| periodical work | नियतकालिक | .. [S. 1 (1)-4th para.] |
| periodicity | नियतकालांतर | [S. 5 (2A)] |
| plan | आराखडा | .. [S. 1 (1)] |
| prefer an appeal | अपील दाखल करणे | .. [S. 8C (1)] |
| press | मुद्रण | .. [Short title] |
| Press Registrar | मुद्रण निबंधक | .. [S. 1 (1)-7th para.] |
| printing | मुद्रण | .. [S. 1 (1)-8th para.] |
| printing by lithography | शिळाछापाचे मुद्रण | .. [S. 1 (1)-8th para.] |
| printing press | मुद्रणालय | .. [Preamble] |
| prints | छापप्रती | .. [S. 9] |
| public news | लोकवार्ता | .. [S. 1 (1)-4th para.] |
| put in evidence | पुराव्यात दाखल करणे | .. [S. 8-4th para.] |
| Register of newspapers | वृत्तपत्रांची नोंदवही | .. [S. 19B (1)] |
| Registrar of newspapers | वृत्तपत्र निबंधक | .. [S. 19A ] |
| report | अहवाल | .. [S. 19G] |
| return | प्रतिवेदन | .. [S. 19E] |
| sheet of music | स्वरांकनपत्र | .. [S. 1 (1)] |
| sheets | ताव | .. [S. 18 (8)] |
| statement | विवरण | .. [S. 19D (*a*)] |
| volume | ग्रंथ | .. [S. 1 (1)] |

## मुद्रण अणि पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७
## THE PRESS AND REGISTRATION OF BOOKS ACT, 1867
### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिकथन | declaration | .. [S. 5 (2)] |
| अपील दाखल करणे | prefer an appeal | .. [S. 8C (1)] |
| अहवाल | report | .. [S. 19G] |
| अक्षर-मुद्रण | letter-press | .. [S. 9 (*i*)] |
| आराखडा | plan | .. [S. 1 (1)] |
| आवृत्ति | edition | .. [S. 9 (*i*)] |
| कालिक | paper | .. [S.1 (1)-5th para.] |
| कोरीव छाप | engravings | .. [S. 9] |
| गमावणीपात्र रकमा | forfeitures | .. [S. 17] |
| ग्रंथ | volume | .. [S. 1 (1)] |
| ग्रंथांची सूची | Catalogue of Books | .. [S. 18] |
| चक्रमुद्रण | cyclostyling | .. [S. 1 (1)-8th para.] |
| छापप्रती | prints | .. [S. 9] |
| टाचण | memorandum | .. [S. 18] |
| तक्ता | chart | .. [S. 1 (1)] |
| तपशील | account | .. [S. 5 (2)] |
| ताव | sheets | .. [S. 18 (8)] |
| नकाशा | map | .. [S. 1 (1)] |
| नियतकालांतर | periodicity | .. [S. 5 (2A)] |
| नियतकालिक | periodical work | [S. 1 (1)-4th para.] |
| निक्षेप | deposit | .. [S. 6-3rd para.] |
| पत्रक | pamphlet | .. [S. 1 (1) ] |
| परिष्कृत केलेले व रंगवलेले | finished and coloured | .. [S. 9] |
| पाने | leaves | .. [S. 18 (8)] |
| पुराव्यात दाखल करणे | put in evidence | .. [S. 8-4th para.] |
| पुस्तक | book | [S. 1 (1)] |
| पृष्ठे | pages | .. [S. 18 (8)] |
| प्रतिवेदन | return | .. [S. 19E] |
| भागीदारी संस्था | firm | .. [S. 18 (6)] |
| मुद्रण | (1) press | .. [Short title] |
| | (2) printing | .. [S. 1( 1)-8th para.] |
| मुद्रण निबंधक | Press Registrar | .. [S. 1 (1)-7th para.] |
| मुद्रणालय | printing press | .. [Preamble] |
| मुद्रणालय व्यवस्थापक | keeper of printing press | .. [S. 4-m.n.] |
| लोकवार्ता | public news | .. [S. 1 (1)- 4th para.] |
| विवरण | statement | .. [S. 19D (*a*)] |
| वृत्तपत्र | newspaper | .. [S. 1 (1)-4th para.] |
| वृत्तपत्र निबंधक | Registrar of newspapers | .. [S. 19A] |
| वृत्तपत्रांची नोंदवही | Register of newspapers | .. [S. 19B (1)] |
| शिळाछापाचे मुद्रण | printing by lithography | .. [S. 1 (1)-8th para.] |
| संपादक | editor | .. [S. 1 (1)-2nd para.] |
| सादर करणे | delivery | .. [Part III-heading] |
| स्वरांकन पत्र | sheet of music | .. [S. 1 (1)] |
| स्वाक्षरीनिशी अधिकथन करून देणे | make and subscribe a declaration | [S. 5 (2)] |